**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यातल्या खासगी शाळा आणि शिकवणी वर्गातल्या शुल्कावर मर्यादा आणण्यासाठी सरकार लवकरच धोरण जाहीर करणार

- मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन

- ४थ्या विश्व मराठी साहित्य संमेलनाला प्रारंभ

- केंद्र सरकार तंत्रज्ञानाच्या आधारे प्रशासनाचा विस्तार करत असून त्यामुळेच देश वेगाने प्रगती करत असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- उत्पादनशुल्क घोटाळ्यात दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांची पुराव्याअभावी मुक्तता

**आणि**

- एनसीईआरटीच्या वादग्रस्त पुस्तकाच्या प्रती मागे घेण्याचे केंद्रीय शिक्षण मंत्र्यांचे निर्देश

**<><><><><>**

राज्यातल्या खासगी शाळा आणि शिकवणी वर्गातल्या शुल्कावर मर्यादा आणण्यासाठी सरकार लवकरच धोरण जाहीर करणार असल्याची घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज विधानसभेत केली. राज्यातल्या शाळांची परिस्थिती, शिक्षणाचा अधिकार आणि संबंधित विषयावर सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर ते उत्तर देत होते. येत्या शैक्षणिक वर्षात मराठी शाळांमधली पटसंख्या किमान २५ टक्के वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राज्य शासन मराठी माध्यमाच्या शाळांकडे विशेष लक्ष देऊन सर्व प्रकारच्या भौतिक सुविधा उपलब्ध करून देत आहे, याखेरीज इतर अनेक उपक्रमही राबविले जात आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात मराठी शाळांबाबतचा प्रश्न विक्रम पाचपुते यांनी उपस्थित केला होता. त्यावर संजय केळकर, प्रवीण दटके, असलम शेख, अमित देशमुख, कैलास पाटील, राहुल कुल यांनी उपप्रश्न विचारले.

शिक्षणाच्या अधिकाराअंतर्गत प्रवेशासाठीची 1 किलोमीटरची मर्यादा, शाळा नसतील तिथे शिथिल करण्याचा विचार करू असं आश्वासन भुसे यांनी दिलं. राज्यातल्या जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सुविधा वाढवण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे, असं आश्वासन त्यांनी दिलं. गेल्या काही वर्षांत आधार प्रमाणीकरणामुळे ९ लाख दुबार विद्यार्थी कमी झाल्याची माहिती त्यांनी दिली. विद्यार्थ्यांची लेखन, वाचन आणि गणितातील गती सुधारण्यासाठी निपुण महाराष्ट्र हा उपक्रम सुरू आहे. राज्यातल्या सर्व माध्यमाच्या आणि व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये मराठी शिकवणं  बंधनकारक असून एखाद्या  शाळेत याची अंमलबजावणी होत नसली तर सरकार त्यावर कारवाई करेल असं आश्वासन त्यांनी दिलं.

विधानपरिषदेचं कामकाज आज दुपारी एक वाजता तारांकित प्रश्नोत्तराच्या तासानं सुरु झालं. राज्यातल्या सहा लाखांहून अधिक पात्र शेतकऱ्यांना २०१७ च्या कृषी कर्ज माफी योजनेअंतर्गत अद्याप लाभाची रक्कम मिळालेली नाही, त्यावर अंमलबजावणी होत असल्याचं सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सभेत सांगितलं. २०२५ च्या खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांसंदर्भातली सहकारी पीक कर्जांचं पुनर्गठन केलं जावं तसंच कर्जफेडीची मुदत 1 वर्षानं वाढवून देण्याचे निर्देश दिल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

कांदा उत्पादकांची सुमारे २० कोटींची थकबाकी देण्याचे काम सुरु असल्याची माहिती मंत्री जयकुमार रावळ यांनी सभागृहाला दिली. या प्रकरणी कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी यावर्षी जानेवारीच्या सुरुवातीला नाशिकमध्ये आंदोलन केलं होतं.

जैव विघटनशील नसलेल्या कृत्रिम फुलांवर राज्यात बंदी आहे. सजावटीसाठी अशा फुलांचा वापर करणारी marriage hall, डेकोरेटर वर कारवाई करू असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत लक्षवेधीवरील चर्चेदरम्यान दिलं. यासाठी शासन आदेश जारी करण्याचं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं.

गेल्या काही वर्षात राज्यात हानीकारक पदार्थांचा वापर केलेली ४ हजार टनांहून फुले जप्त केली आहे. ९२ हजारांहून अधिक घटनांमध्ये २५ कोटी रुपयांचा दंड केला असल्याची माहिती पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.

**<><><><><>**

मराठी भाषा गौरव दिन आज साजरा होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. मराठी

भाषा गौरव दिनाच्या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा, कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. मराठी भाषा गौरव दिवसाच्या निमित्ताने विधान भवनातल्या मध्यवर्ती सभागृहात 'जावे विनोदाच्या गावा' या विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. भाषणांमधल्या वक्तव्यांचा चुकीचा अर्थ लावला जाऊ नये यासाठी खबरदारी बाळगली जात असल्यानं आता भाषणांमधला विनोदाचा भाग कमी होत चालल्याची खंत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी व्यक्त केली. वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे संपादित 'लोकसेवेचा लोकजागर' या ग्रंथाचं प्रकाशनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते यावेळी करण्यात आलं.

**<><><><><>**

चौथं विश्व मराठी साहित्य संमेलन आजपासून नाशिक इथं सुरू होत आहे. दुपारी चार वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते या संमेलनाचं उदघाटन होईल. या संमेलनाच्या पार्श्वभूमीवर आज नाशिकमधल्या कुसुमाग्रजांच्या निवासस्थानापासून ग्रंथदिंडी काढण्यात आली. याबाबत आमच्या वार्ताहरानं दिलेला हा वृत्तांत....

**<u>होल्ड- व्हॉईस कास्ट - संजय पाठक</u>**

(ढोल ताशाचा गजर, कुठे हाती तालबध्द लेझिम पथक तर मराठमोळ्या वेशात नृत्य, कुठे "ज्ञानबा-तुकाराम"चा गजर तर कुठे मराठीचा जयजयकार करणारी फलकबाजी... अशा उत्साही आणि भारलेल्या वातावरणात मराठीचा जागर ग्रंथदिंडीतून दुमदुमला. नाशिक येथे सुरू असलेल्या चौथ्या विश्व मराठी संमेलनाच्या पार्श्वभूमीवर आज कुसुमाग्रजांच्या निवासस्थानापासून ग्रंथदिंडीला उत्साहात प्रारंभ करण्यात आला. कुसुमाग्रजांच्य निवासस्थानी त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शासनाच्यावतीने प्रतिष्ठानला ११४ पुस्तके भेट देण्यात आली. ग्रंथदिंडीचा शुभारंभ महापौर हिमगौरी आडके, उपमहापौर विलास शिंदे, स्वागताध्यक्ष नितीन ठाकरे, बाल रंगभूमीच्या अध्यक्ष नीलम शिर्के-सामंत, भाषा संचालनालयाचे किरण कुलकर्णी आदिंच्या उपस्थितीत करण्यात आला. ग्रंथदिंडीची सुरुवात पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात झाली. ८० शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थी, साहित्यप्रेमी, सांस्कृतिक संस्था, तसेच मराठी भाषा संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या संघटनांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या महिला फुगड्या खेळत

होत्या, तर लेझिम पथकांनी तालबद्ध सादरीकरण करत दिंडीची शोभा वाढवली. ग्रंथदिंडीला कुसुमाग्रजांच्या निवासस्थानापासून सुरूवात होत जिल्हाधिकारी कार्यालय, अशोक स्तंभमार्गे रावसाहेब थोरात सभागृहात समारोप करण्यात आला. या ग्रंथदिंडीत आळंदी येथील आळंदी येथील जोग महाराज कीर्तन वारकरी शिक्षण संस्थेच्या तब्बल ४०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.)

**<><><><><>**

देशातल्या विविध उद्योगांनी नवोन्मेषाच्या संकल्पना मधे गुंतवणुकीसाठी पुढे यावं असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. विकसित भारतासाठी तंत्रज्ञान, सुधारणा आणि निधीची तरतूद या विषयावर आयोजित अर्थसंकल्पोत्तर वेबिनारला ते आज दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित करत होते. राष्ट्रीय अर्थसंकल्पाचं मूल्यमापन अनेकदा वेगवेगळ्या निकषांवर केलं जातं. पण, राष्ट्रीय अर्थसंकल्प हे अल्पकालीन अंदाजपत्रक नसून तो विकासाचा धोरणात्मक आराखडा आहे. त्यामुळे त्याचं मूल्यमापन हे तितक्याच ठोस निकषांवर व्हायला हवं असं मोदी यावेळी म्हणाले. येत्या काही दशकांमध्ये देशातले महामार्ग, रेल्वेमार्ग, बंदरे, डिजिटल नेटवर्क, उर्जा प्रणाली यांसारख्या पायाभूत सुविधा हे भारताच्या विकासाचा पाया ठरणार आहेत, असं ते म्हणाले. कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन आणि डेटा ॲनालिटिक्सचा व्यापक वापर करून प्रशासनाची पारदर्शकता, वेग आणि जबाबदारी वाढवण्याची गरज मोदी यांनी यावेळी व्यक्त केली.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सध्या  राजस्थानच्या दौऱ्यावर असून  जैसलमेर इथं हवाई दलाच्या वायू शक्ती या सरावाला त्या आज उपस्थित राहाणार आहेत. स्वदेशी बनावटीच्या कमी वजनाच्या  लढाऊ हेलिकॉप्टर, 'प्रचंड' मधून त्यांनी उड्डाण केलं. प्रचंड हे हिंदुस्थान एअरोनॉटिक्सने विकसित केलेलं हेलिकॉप्टर असून त्याचं आरेखन पूर्णपणे स्वदेश निर्मित आहे. 'प्रचंड' हे आत्मनिर्भर भारताचं शक्तिशाली प्रतीक असल्याचं त्या यावेळी म्हणाल्या.

**<><><><><>**

उत्पादन शुल्क घोटाळ्यात दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना दिल्लीतल्या न्यायालयानं दोषमुक्त केलं आहे.

सीबीआयनं दाखल केलेल्या आरोपपत्रात ठोस पुराव्याच्या अभावी अनेक विसंगती आढळून आल्याचं विशेष न्यायाधीश जितेंद्र सिंग यांनी म्हटलं आहे. या प्रकरणातल्या इतर २१ आरोपींनाही न्यायालयानं दोषमुक्त ठरवलं आहे.

दरम्यान, या प्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयात तात्काळ आव्हान याचिका दाखल केली जाईल, असं सीबीआयनं म्हटलं आहे. तपासातले अनेक पैलू खालच्या न्यायालयानं लक्षात घेतले नाहीत किंवा ते पुरेसे असल्याचं मानलं नाही, असंही सीबीआयच्या प्रवक्त्यानं सांगितलं.

**<><><><><>**

एनसीईआरटीच्या पुस्तकात न्यायव्यवस्थेतल्या भ्रष्टाचारासंदर्भात मजकूर असणं अतिशय दुर्दैवी असून सरकार या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहत असल्याचं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान म्हणाले. ते आज माध्यमांशी बोलत होते. या प्रकाराचं गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने एनसीईआरटीला या पुस्तकाच्या प्रती मागे घेण्याचे निर्देश दिल्याचं प्रधान यावेळी म्हणाले. न्यायव्यवस्थेचा अवमान करण्याचा सरकारचा कुठलाही हेतू नसल्याचंही प्रधान यांनी यावेळी स्पष्ट केलं. अशा प्रकारचा आशय पुस्तकात समाविष्ट करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असंही प्रधान म्हणाले.

**<><><><><>**

टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेच्या 'सुपर एट' फेरीत, आज कोलंबोत, इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात लढत होणार आहे. सामना संध्याकाळी ७ वाजता सुरु होईल.

चेन्नईत काल झालेल्या सामन्यात, भारताने झिम्बाब्वेचा 72 धावांनी पराभव केला. भारतीय संघाने दिलेल्या 257 धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना झिम्बाब्वे संघाला 20 षटकांत 6 गडी बाद 184 धावा करता आल्या.

याच स्पर्धेच्या अहमदाबाद मध्ये झालेल्या सामन्यात दक्षिण आफ्रिका संघाने वेस्ट इंडिज संघाचा 9 गडी राखून पराभव केला.

दक्षिण आफ्रिका, आणि इंग्लंड यांनी उपान्त्य फेरीतलं स्थान निश्चित केलं आहे.

भारताला उपान्त्य फेरीत पोहोचण्यासाठी येत्या १ मार्चला रविवारी वेस्ट इंडीजबरोबरचा सामना जिंकावा लागेल.

**//<><><><><>//**